**तक्रारदार तर्फे साक्षीदार क्र. – ०१**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**सं.फौ.ख.क्र.११११/२०१९**
**निलेश विरुध्द गेंदुराम**
**निशाणी – ०५**

**सरतपासणी शपथेवर सुरु द्वारे वकील श्री. उपाध्याय यांच्या मार्फत**

**०८.** मी सदर प्रकरणात माझे सरतपासाचे लेख दाखल केला असून त्यातील मजकूर माझे वकीलांनी माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे. त्यातील मजकूर माझे माहितीप्रमाणे खरा व बरोबर असून त्यावर मी वाचून समजून सही केली आहे. तो निशाणी ०५ वर आहे.

**०९.** मी कागदयादी निशाणी १२ अनुक्रमांक ०१ कडे आरोपीने मला दिलेला दिनांक १४/०६/२०१९ रोजीचा धनादेश क्रमांक ९०४७१६ रुपये ३०,०००/– चा शिक्षक सहकारी बॅंक, शाखा कामठी ची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर आरोपीची सही असून ती सही मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २५** देण्यात येते.

**१०.** मी कागदयादी निशाणी १२ अनुक्रमांक ०२ कडे वादातील धनादेश वटण्याकरीता बॅंकेत जमा केल्याची काऊंटरची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यावर संबंधित बॅंकेच्या लिपीकाची सही व बॅंकेचा शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २६** देण्यात येते.

**११.** मी कागदयादी निशाणी १२ अनुक्रमांक ०३ कडे वादातील धनादेश खाते कार्यानवित नसल्याचे शे–याने अनादरीत झाल्याचा दिनांक १९/०६/२०१९ रोजीच्या मेमोची मुळ दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २७** देण्यात येते.

**१२.** मी कागदयादी निशाणी ०४ अनुक्रमांक ०३ कडे वादातील धनादेश न वटता परत आल्याने धनादेशाची रक्कम मागणी करीता दिनांक ०१/०७/२०१९ रोजी पाठविलेल्या नोटीसीची कार्यालयीन प्रत दाखल केली आहे. त्यावर माझ्या वकीलांची सही आहे ती सही मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २८** देण्यात येते.

**१३.** मी कागदयादी निशाणी ०४ अनुक्रमांक ०४ कडे नोटीस पाठविल्याची पोस्टाची मुळ पावती दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी २९** देण्यात येते.

**१४.** मी कागदयादी निशाणी १२ अनुक्रमांक ०४ कडे मी व आरोपी मध्ये हातउसणे रक्कम घेतल्याबाबतचा दिनांक १४/०९/२०१८ रोजीचा झालेल्या करारनाम्याची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ३०** देण्यात येते.

**सरतपास पुढील तारखेपर्यत तहकुब**.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

AMIT ANIL KULKARNI
Digitally signed by AMIT ANIL KULKARNI
Date: 2024.06.01 11:49:02 +0530

( अमित अ. कुळकर्णी )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१, कामठी

कामठी
दिनांक ०१/०६/२०२४